// प्रकरण – सातवे //

## // संशोधनाचा सारांश, निष्कर्ष अनुमान व सूचना //

७.१ संशोधनाचा सारांश,

७.२ संशोधनाच्या माहिती आधारे काढलेले निष्कर्ष.

१] प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष.

२] प्रतिसादक प्राचार्यांच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष.

३] प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष.

७.३ प्रतिसादक प्राचार्यांच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष

७.४ प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीच्याआधारे काढलेले निष्कर्ष.

७.५ सूचना / शिफारसी.

७.६ पुढील संशोधनासाठी विषय.

## // प्रकरण - ७ वे //

## // संशोधनाचा सारांश //

### ७.१ ** संशोधनाचा सारांश :-

अभ्यासकाने सदरील शोध - निबंधासाठी "उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास" विषय निवडलेला आहे.

या संशोधन विषयाच्या संशोधनासाठी अभ्यासकाने संशोधनाच्या सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सदर संशोधनासाठी उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील चार प्राचार्यांकडून प्रश्नावलीच्या साहाय्याने माहिती गोळा केली आहे. त्याच प्रमाणे १९ प्राध्यापकांकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती गोळा केली आहे. तसेच विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेत असलेले पुरुष आणि स्त्री प्रशिक्षणार्थी [प्रथमवर्ष आणि द्वीतीय वर्ष] ७७ यांच्या कडून प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती गोळा केली आहे. या मध्ये अभ्यासकाने प्रशासकीय समस्या, भौतिक साधन संपत्ती, मनुष्यबळ समस्या, शैक्षणिक समस्या, सराव पाठसंबंधीच्या समस्या, ग्रंथालय समस्या, इत्यादी समस्या या बाबत माहिती गोळा केलेली आहे. त्यासाठी प्रश्नावली मुलाखती चर्चा, अध्यापक विद्यालयास प्रत्यक्ष भेटी इत्यादी संशोधन साधनांचा वापर केला आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन प्रकरण ५ मध्ये केले आहे. सदर प्रकरणामध्ये संकलित माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष व निष्कर्षांचा सारांश, सुचना / शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी विषय दिलेले आहेत.

थोडक्यात विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना, अध्यापक विद्यालयातील प्राचार्य, शिक्षकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय, सामाजिक समस्या यांच्या विषयीच्या सुधारण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना भेडसावणाऱ्या समस्या, प्राचार्य, प्राध्यापकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय समस्या यांना तोंड देवून प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकास साधता येईल अशा प्रशिक्षणासाठी सज्ज करण्याचा प्रयत्न आहे. आलीकडील काळात शिक्षकांच्या दर्जा विषयी शंका निर्माण होते. जर त्यांना दर्जेदार प्रशिक्षण मिळाले तर शिक्षकांचा दर्जा उंचावेल तसेच आपल्या देशाला गुणी, ज्ञानी, चारित्र्यावान नागरिक पुरविले जातील. जगात अनेक प्रकारचे व्यवसाय आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रविज्ञानात्मक, लष्करी इत्यादी परंतु हे डॉक्टर्स, इंजिनिअर्स घडविणारा शेवटी शिक्षकच असतो त्यामुळे प्रशिक्षणार्थींनी उत्तम प्रशिक्षण घेण्याची आणि अध्यापक विद्यालयांनी उत्तमोत्तम प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करावा.

अध्यापन करणे हे शिक्षकाचे महत्वाचे कर्तव्य असते आणि या अध्यापनात त्याला पारंगतता यावी, त्याचे अध्यापन प्रभावी व्हावे, ते अधिक उपयुक्त आणि परिणामकारक व्हावे या दृष्टीनेच शिक्षकांच्या प्रशिक्षणाची योजना आखलेली असते म्हणून जरी

विनाअनुदानित अध्यापक विद्यालय असले तरी प्रशिक्षणार्थींना उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

७.२ ** संकलित माहितीचे निष्कर्ष :-

१] प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष :-

कोष्टक क्रमांक ६.१ च्या आधारे :-

प्रतिसादक एकुण ७७ प्रशिक्षणार्थी पैकी प्रथम वर्ष स्त्री आणि पुरुष प्रशिक्षणार्थी आणि द्वीतिय वर्ष स्त्री आणि पुरुष प्रशिक्षणार्थी यांना पाठविलेल्या प्रश्नावल्या पैकी प्रथम वर्ष स्त्री प्रशिक्षणार्थी द्वितीय वर्ष स्त्री प्रशिक्षणार्थी १० प्रथम वर्ष पुरुष प्रशिक्षणार्थी ३१,२५ द्वितिय वर्ष प्रशिक्षणार्थी यांच्याकडून प्रश्नावल्या भरुन आलेल्या आहेत. प्रथम वर्ष आणि द्वीतिय वर्ष स्त्री प्रशिक्षणार्थीचे २६. २५ शेकडा प्रमाण तर प्रथम वर्ष आणि द्वितिय वर्ष पुरुष प्रशिक्षणार्थीचे ७०% शेकडा प्रमाण आहे.

यावरुन पुरुष प्रशिक्षणार्थीचे ७०% शेकडा प्रमाणे सर्वात जास्त आहे.

[२] प्रशिक्षणार्थींसाठीच्या प्रश्नावलीतील विभाग २ च्या बाबत चे निष्कर्ष :-

प्रतिसादक एकुण प्रशिक्षणार्थींच्या मध्ये प्रश्नावली माहितीच्या निष्कर्षातून व्याख्यान कक्ष विषयक वर्गीकरणा

स्वतंत्र व्याख्यान कक्ष असणारी अध्यापक विद्यालयातील - ४७ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ५७.७५% इतके आहे. व्याख्यान कक्ष स्वतंत्र नाहीत असा प्रशिक्षणार्थी -३० आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ३७.५% आहे.

व्याख्यान कक्षातील बैठक व्यावस्था आणि फलक प्रकाश योजना योग्य आहे असी माहिती देणारे - ५५ प्रशिक्षणार्थी आहेत. तर व्याख्यान कक्षातील बैठक व्यवस्था आणि फलक व प्रकाश योजना योग्य नाही असी माहिती देणाऱ्या प्रशिक्षणार्थी ची संख्या २२ आहे.

या वरुन स्वतंत्र व्याख्यान कक्ष आहे /नाही माहिती देणाऱ्यांचे प्रमाण सर्वात अधिक आहे. त्याच्या नंतर स्वतंत्र व्याख्यान कक्ष आहे/नाही माहितीचे प्रमाण कमी आहे. व्याख्यान कक्षातील बैठक व्यवस्था आणि प्रकाश योजना योग्य आहे / नाही माहितीचे प्रमाण जास्त आहे. व्याख्यान कक्षातील बैठक व्यवस्था आणि फलक प्रकाश योजना योग्य आहे / नाही माहितीचे प्रमाण कमी आहे.

यावरुन व्याख्यान कक्ष आहे बैठक व्यवस्था फलक व प्रकाश योजना योग्य आहे याचे प्रमाण जास्त आहे. तर योग्य नाही माहितीचे प्रमाण कमी आहे.

[३] <u>प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीतील विभाग ३ च्या बाबतचे निष्कर्ष</u> :-

प्रतिसादक एकुण स्त्री आणि पुरुष प्रशिक्षणार्थींच्या विज्ञान प्रयोगशाळा विषयक माहितीच्या आधारे काढलेल्या निष्कर्षातुन अध्यापक विद्यालयात स्वतंत्र विज्ञान प्रयोग शाळा आहे. माहिती देणारे ६० प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ७५%

इतके आहे. तर स्वतंत्र प्रयोग शाळा नाही माहिती देणारे प्रशिक्षणार्थी - १७ आहेत त्यांचे शेकडा प्रमाण २१.२५% इतके आहे. प्रयोग शाळेत सराव पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात मिळते माहिती देणारे ६५ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ८१.२५% आहे. तर प्रयोग शाळेत सराव पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात मिळत नाही. अशी माहिती देणाऱ्या प्रशिक्षणार्थींची संख्या ३२ आहे. त्याचे शेकडा प्रमाण १५ आहे.

यावरुन स्वतंत्र प्रयोगशाळा, सराव पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात मिळते याचे प्रमाण सर्वात अधिक आहे. आणि सर्वात कमी प्रमाण प्रयोगशाळा स्वतंत्र नाही, सराव पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात मिळत नाही.

[४] <u>प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीतील विभाग ४ च्या बाबतचे निष्कर्ष</u> :-

प्रतिसादक एकूण प्रशिक्षणार्थींच्या ग्रंथालय विषयक माहितीच्याआधारे काढलेल्या निष्कर्षातून प्रतिसादक प्रशिक्षणार्थींनी अध्यापक विद्यालयात स्वतंत्र ग्रंथालय आहे. संदर्भ पुस्तके पुरेशा प्रमाणात मिळतात, ग्रंथपालाकडून सहकार्य मिळते. ग्रंथालयात अभ्यासिका आहे. अशी माहिती दिली आहे. त्यामध्ये स्वतंत्र ग्रंथालय आहे माहिती देणारे प्रशिक्षणार्थी ६२ आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ७७.५ आहे. संदर्भ पुस्तके मिळणारे - ५९ प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे

शेकडा प्रमाण ७३.५५ आहे. ग्रंथपालाचे सहकार्य मिळणारे ७० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ८७.५ आहे तर ग्रंथालयात अभ्यासीका आहे माहिती देणारे ३० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ३७.५ आहे.

स्वतंत्र ग्रंथालय नाही माहिती देणारे प्रशिक्षणार्थी १५ आहेत. त्याचे शेकडा प्रमाण १८.७५ आहे. संदर्भ पुस्तके काही प्रमाणात मिळणारे १८ प्रशिक्षणार्थी आहेत त्याचे शेकडा प्रमाण २२.५ आहे. ग्रंथपालाकडून काही प्रमाणात सहकार्य मिळणारे प्रशिक्षणार्थी ७ आहेत त्याचे शेकडा प्रमाण ८.७५ आहे. तर अभ्यासिका नाही अशी माहिती देणारे ४७ प्रशिक्षणार्थी आहेत त्याचे शेकडा प्रमाण ५८.७५ आहे.

यावरुन प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्या ग्रंथालय विषयक माहितीच्याआधारे ग्रंथालय आहे. ६२ याचे प्रमाण जास्त आहे पुस्तके मिळतात ५९ याचे प्रमाण जास्त आहे. स्वतंत्र अभ्यासिका नाही. ४७ याचे प्रमाण जास्त आहे.

[५] <u>प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीतील विभाग ५ बाबतचे निष्कर्ष</u> :-

प्रतिसादक प्रथम वर्ष, द्वीतिय वर्ष, स्त्री आणि पुरुष प्रशिक्षणार्थींच्या क्रिडांगण विषयक माहितीच्या आधारे काढलेल्या निष्कर्षातून अध्यापक विद्यालयात क्रिडांगण आहे. अशी माहिती देणारे प्रशिक्षणार्थी ६६ असून त्याचे शेकडा प्रमाण ८२.५ इतके आहे. अध्यापक विद्यालयात क्रीडांगण नाही अशी माहिती देणारे प्रशिक्षणार्थी ११ असून त्याचे शेकडा प्रमाण १३.७५ इतके आहे. क्रिडासाहित्य उपलब्ध होते, माहिती

देणारे प्रशिक्षणार्थी ५२ असून त्याचे शेकडा प्रमाण ६५ आहे. तर क्रिडासाहित्य कांही प्रमाणात उपलब्ध होते. माहीती देणारे २० प्रशिक्षणार्थी, असून त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे. आणि अध्यापक विद्यालयात क्रिडासाहित्य मिळत नाही. माहिती देणारे प्रशिक्षणार्थी ५ आहेत त्याचे शेकडा प्रमाण ६.२५ आहे.

यावरुन क्रिडांगणा विषयीची होकारात्मक माहिती देणारे ६६ प्रशिक्षणार्थी आहेत तर नकारात्मक माहिती देणारे ११ प्रशिक्षणार्थी आहेत. यात होकारात्मक माहिती देणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण जास्त आहे.

[६] <u>प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीतील विभाग ६ बाबतचे निष्कर्ष</u> :-

प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्याकार्यानुभव विषयक माहितीच्या आधारे काढलेल्या निष्कर्षातुन कागदकाम, स्वच्छता, साफ-सफाई करणारेप्रशिक्षणार्थी ४७ आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ५८.७५% आहे. बागकाम, कुंडीकाम करणारे प्रशिक्षणार्थी २० आहेत त्यांचे शेकडा प्रमाण २५% आहे. तर नकारात्मक प्रतिसाद देणारे १० प्रशिक्षणार्थी आहेत.

यावरुन स्वच्छता, साफ-सफाई करणारे प्रशिक्षणार्थी चे प्रमाण सर्वात जास्त आहे.

कागदकामातून होडी, विमान, आकाश कंदिल करणारे ४७ प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ५८.७५ आहे तर कागदकामातून कागदाचे घर, ट्रे, लेटर बॉक्स करणारे २० प्रशिक्षणार्थी आहेत त्यांचे शेकडा प्रमाण २५ आहे. आणि

१० प्रतिसादकांनी नकारात्मक प्रतिसाद दिला.

यावरून कागद कामातून होडी, विमान करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

यावरून कागद कामातून
तज्ञांचे मार्गदर्शन मिळणारे ६६ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ७८.७५ आहे. तर नकारात्मक प्रतिसाद देणारे १४ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण १७.५ आहे.

यावरून तज्ञांचे मार्गदर्शन मिळणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

[७] <u>प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीतील विभाग ७ बाबतचे निष्कर्ष</u> :-

प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्या सराव पाठ विषयक माहितीच्याआधारे काढलेल्या निष्कर्षातून मार्गदर्शनासाठी स्वतंत्र वर्ग असणारे ६७ प्रशिक्षणार्थी आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ८३.७५ आहे. तर नकारात्मक प्रतिसाद देणारे प्रशिक्षणार्थी १० आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण १२.५ आहे.

यावरून मार्गदर्शनासाठी स्वतंत्र वर्ग असणारे प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

प्रतिसादक प्रशिक्षणार्थींना सराव पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य मिळणारे ६० प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ७५% आहे. तर शैक्षणिक साहित्या बाबत नकारात्मक प्रतिसादन देणारे १७ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण २१.२५ आहे.

यावरून सराव पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य मिळत असणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

सराव पाठास लागणारे शैक्षणिक साहित्य तयार करण्यास मार्गदर्शन मिळणारे ६० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ७५ आहे. काही प्रमाणात मार्गदर्शन मिळणारे प्रशिक्षणार्थी १० आहेत. त्याचे शेकडा प्रमाण १२.५ आहे तर मार्गदर्शना बाबत नकारात्मक प्रतिसाद देणारे ५ प्रशिक्षणार्थी आहेत.

यावरून शैक्षणिक साहित्य तयार करण्यास मार्गदर्शन मिळणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

सराव पाठ घेताना अडचणी येत नसणारे ६० प्रशिक्षणार्थी आहेत त्याचे शेकडा प्रमाण ७५ आहे. शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत नाही, मार्गदर्शन मिळत नाही अशा सराव पाठास अडचणी येणारे १७ प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण २१.२५ आहे.

यावरून सराव पाठ घेताना अडचणी नसणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. सराव पाठ घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्राध्यापकांचे सहकार्य मिळणारे ७० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ८७.५ आहे. प्राध्यापकांचे सहकार्य मिळत नसऱ्या प्रशिक्षणार्थींची संख्या ७ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ८०.७५ आहे.

यावरून प्राध्यापकाचे सहकार्य मिळणारे ७० प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

८] प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीतील विभाग ८ बाबतचे निष्कर्ष :-

प्रतिसादक प्रशिक्षणार्थींच्या सुक्ष्म अध्यापना विषयक माहिती-च्या आधारे काढलेल्या निष्कर्षातून सुक्ष्म अध्यापनाच्या आठ कौशल्यांचे पाठ घेतले जातात असे ७७ प्रशिक्षणार्थींनी सांगितले त्याचे शेकडा प्रमाण ९६.२५% आहे. तसेच सुक्ष्म अध्यापनात घेतलेल्या अध्यापन कौशल्यांची नावे ७७ प्रशिक्षणार्थींनी दिली आहेत। त्याचे शेकडा प्रमाण ९६.२५ आहे।

यावरुन आठ कौशल्य पाठ आणि त्यांची नावे देणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण ९६.२५ आहे.

अध्यापकविद्यालयात सहशालेय कार्यक्रम करताना अडचणी येत नसणारे ७७ प्रशिक्षणार्थी आहेत त्याचे शेकडा प्रमाण ९६.२५ आहे.

अध्यापक विद्यालयात गुणवत्ता वाढीसाठी व्याख्यानमाला, सराव परीक्षा, वेगवेगळ्या स्पर्धांत भाग घेणारे ७० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ८७.५ आहे. तर गुणवत्ता वाढीसाठी कोणतेच उपक्रम घेतले जात नाहीत अशी माहिती देणारे ७ प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ८.७५ आहे।

यावरुन गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळे उपक्रम घेतले जातात. या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

गुणवत्ता वाढीसाठी असणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा उपयोग झाला अशी माहिती देणारे ६० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ७५ आहे. तर उपक्रमांचा कांही प्रमाणात उपयोग होणारे १५ प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण १८.७५ आहे. आणि उपक्रमांचा कांहीच उपयोग झाला नाही अशी माहिती देणारे २ प्रशिक्षणार्थी आहेत।

त्याचे शेकडा प्रमाण २.५ आहे.

यावरून गुणवत्ता वाढीसाठी असणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा उपयोग झाला माहिती देणारे यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळे उपक्रम सुचविणारे ५७ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ७१.२५ आहे. उपक्रमांची नांवे न सुचविणारे २० प्रशिक्षणार्थी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे.

यावरून गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळे उपक्रम नसावेत असे सुचविणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

अध्यापकविद्यालयात संदर्भ साहित्य, पुरेसे खेळाचे साहित्य, प्रयोगशाळा इत्यादी सुविधा असाव्यात असे ७७ प्रशिक्षणार्थींना वाटते त्याचे शेकडा प्रमाण ९६.२५ आहे.

७.३. ** प्रतिसादक प्राचार्यांच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष :-

[१] कोष्टक क्रमांक ६.४ च्या आधारे :-

एकूण प्रतिसादक प्राचार्यांना दिलेल्या प्रश्नावलीच्या आधारे माहितीच्या निष्कर्षातून प्राचार्यांची शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता नुसार बी.ए. बी.पी.एड्. प्राचार्य १ असून शेकडा प्रमाण २५ आहे. एम.ए.बी.एड्. १ असून शेकडा प्रमाण २५ आहे. एम.ए. एम.एड्. १ असून शेकडा प्रमाण २५ आहे.

यावरून सर्वांचे शेकडा प्रमाण २५ असून ते सर्वात सारखे प्रमाण आहे.

[९] कोष्टक क्रमांक ६.५ च्या आधारे :-

एकूण प्रतिसादक प्राचार्यांना दिलेल्या प्रश्नावली माहितीच्या एकूण प्रतिसादक आधारे काढलेल्या निष्कर्षातून असे आढळून आले की, प्राचार्यांचे पदवी व पदव्युत्तर विषयांच्या वर्गीकरणामध्ये बी.ए.बी.एड्. ला इतिहास विषय ३ असून शेकडा प्रमाण ७५% आहे. हिंदी १ शेकडा प्रमाण २५ आहे.

[१०] कोष्टक क्रमांक ६.६. च्या आधारे :-

एकूण प्रतिसादक प्राचार्यांना दिलेल्या प्रश्नावली माहितीच्या आधारेच्या निष्कर्षातून प्राचार्यांचे अध्यापनाची वर्षे अनुभवा वरुनच्या वर्गीकरणामध्ये ० ते ५ वर्षे असणारे २ प्राचार्य असून शेकडा प्रमाण ५० इतके आहे. ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे १ प्राचार्य असून त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे.

यावरुन असे आढळून आले की, ० ते ५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणारे २ प्राचार्य असून त्याचे शेकडा प्रमाण ५० आहे. ते सर्वात अधिक आहे ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे १ प्राचार्य असून त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे. त्याचे प्रमाण सर्वात कमी आहे.

[११] प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील विविध माहिती बाबतचे निष्कर्ष :-

प्राध्यापकांच्या नेमणूका शासकीय नियमानुसार करणारे ३ प्राचार्य आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ७५% आहे. अध्यापक विद्यालयात जिल्हा परीक्षादेच्या नियमानुसार कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणारे प्राचार्य ३ आहेत.

त्याचे शेकडा प्रमाण ७५ आहे. अध्यापक विद्यालयास शासकीय नियमानुसार इमारत आहे म्हणणारे ३ प्राचार्य आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ७५% आहे. संस्थाचालकांचे सहकार्य मिळणारे शेकडा प्रमाण ७५ आहे.

प्रशिक्षणार्थींच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने अध्यापक विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, व्याख्यान माला, चर्चा सत्र इत्यादी कार्यक्रम राबविणाऱ्या प्राचार्यांचे शेकडा प्रमाण ७५ आहे.

[१२] प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील सराव पाठाच्या समस्ये बाबतचे निष्कर्ष :-

प्रशिक्षणार्थींच्या सराव पाठास शाळा घेतल्या नंतर शाळेकडून कोणत्याही प्रकारचा त्रास न होणारे २ प्राचार्य आहे. त्याचे शेकडा ५० प्रमाण आहे. तर शाळेकडून त्रास होणारे प्राचार्य १ आहेत त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे.

यात सराव पाठास शाळा घेतलया नंतर शाळेकडून त्रास न होणारे यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

[१३] प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील ग्रंथालया बाबतचे निष्कर्ष :-

अध्यापक विद्यालयास शासकीय नियमा नुसार ग्रंथालय आहे. ग्रंथालयातून प्रशिक्षणार्थींना आवश्यक ती सर्व पुस्तके वेळेवर देणारे प्राचार्यांचे शेकडा प्रमाण ७५ आहे.

[१४] प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील प्रशासकीय कर्तव्याबाबतचे निष्कर्ष :-

शैक्षणिक प्रशासकीय कर्तव्य पार पाडताना कोणत्या ही प्रकारच्या अडचणी न येणारे प्राचार्य ३ आहेत त्याचे शेकडा प्रमाण

५० आहे. तर प्रशासकीय कर्तव्ये पार पाडताना वेगवेगळ्या अडचणी येणारे प्राचार्य १ आहेत त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे.

यात शैक्षणिक, प्रशासकीय कर्तव्य पार पाडताना अडचणी न येणारे प्राचार्यांचे प्रमाण जास्त आहे.

कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात याला शेकडा ७५ प्राचार्यांनी प्रतिसाद दिला नाही.

[१५] <u>प्राचार्यांच्या प्रश्नावलीतील अध्यापन पद्धती बाबतचे निष्कर्ष</u> :-

अध्यापक विद्यालयात दहा अध्यापन पद्धती शिकविण्याची सोय आहे. प्रत्येक अध्यापन पद्धतीसाठी स्वतंत्र प्राध्यापक आहेत अशी माहिती देणाऱ्या प्राचार्यांचे शेकडा प्रमाण ७५ आहे. प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष.

**

७.४ ** <u>प्रतिसादक प्राध्यापकांच्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष</u>

एकूण प्रतिसादक प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावली माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्षातून शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार बी. ए. बी. एड्. ६ प्राध्यापक आहेत त्यांचे शेकडा प्रमाण २५ आहे. एम. ए. बी. एड्. ४ प्राध्यापक आहेत त्यांचे शेकडा प्रमाण १६.६६ आहे. बी. ए. बी. पी. एड्. २ प्राध्यापक आहेत त्यांचे ८.३३ शेकडा प्रमाण आहे. एम. कॉम. बी. एड्. १ प्राध्यापकआहेत त्यांचे शेकडा प्रमाण ४.१६ तर बी. एस्सी. बी. एड्. प्राध्यापक १ आहे त्याचे शेकडा प्रमाण ४.१६ आहे. एम. एस्सी. बी. एड्. ३ प्राध्यापक आहेत त्यांचे शेकडा प्रमाण १२.५ आहे.

यावरून बी.ए. बी.एड्. प्राध्यापकांची संख्या ६ असून शेकडा प्रमाण २५ आहे ते सर्वात जास्त आहे तर एम.कॉम. बी.एस्सी. बी.एड्. चे प्राध्यापक १-१ आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ४.१६ आहे ते सर्वात कमी आहे.

१७] कोष्टक क्रमांक ६.९ च्या आधारे :-

एकूण प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीच्या माहिती निष्कर्षातून प्राध्यापकांच्या अध्यापनाच्या कार्याच्या अनुभावा वरून वर्षाचे वर्गीकरणामध्ये ० ते ५ वर्षे अध्यापन अनुभव असणारे १८ प्राध्यापक असून त्यांचे शेकडा प्रमाण ७५% इतके आहे ६ ते १० वर्षे अध्यापन अनुभव असणारे १ प्राध्यापक असून त्याचे शेकडा प्रमाण ४.१६ आहे.

यावरून ० ते ५ वर्षे अनुभव असणारे प्राध्यापक १८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ७५% असून ते सर्वात अधिक आहे. सर्वात कमी प्रमाण ६ ते १० वर्षे अध्यापन अनुभव असणारे १ प्राध्यापक असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.१६ आहे.

१८] प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील वेतना बाबतचे निष्कर्ष :-

एकुण प्रतिसादक प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीच्या माहितीच्या आधारेच्या निष्कर्षातून शासकीय नियमानुसार वेतन मिळणारे - १५ प्राध्यापक आहेत त्याचे शेकडा प्रमाण ६२.५ आहे. तर शासकीय नियमानुसार वेतन न मिळणारे ४ प्राध्यापक आहेत. त्याचे शेकडा प्रमाण १६.६ आहे.

यावरून विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात शासकीय नियमा-

नुसार वेतन न मिळणारे ४ प्राध्यापक असून त्याचे शेकडा प्रमाण १६.६ आहे.

१९] प्राध्यापकांच्या अध्यापन विषयक वेगवेगळ्या कोर्स बाबतचे निष्कर्ष:-

एकूण प्रतिसादक प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीच्या आधारे काढलेल्या निष्कर्षातून आजपर्यंत अध्यापन विषयक असणारे वेगवेगळे कोर्स न करणारे प्राध्यापक १५ आहेत त्याचे शेकडा प्रमाण ६२.५ आहे तर पदविका नवीन अभ्यासक्रमाचा १५ दिवसांचा, म.रा.शि. सं.व.प्र.केंद्र पुणेचा, डी.पी.ई.पी.चा. आनंददायी प्रशिक्षण इत्यादी वेगवेगळे कोर्स करणारे - ४ प्राध्यापक आहेत. त्याचे शेकडा प्रमाण १६.६६ आहे.

यावरुन अध्यापन विषयक वेगवेगळे कोर्स न करणाऱ्या प्राध्यापकांचे प्रमाण जास्त आहे.

२०] प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील ग्रंथालया बाबतचे निष्कर्ष :-

एकूण प्रतिसादक प्राध्यापकांना दिलेल्याप्रश्नावलीच्या आधारे काढलेल्या निष्कर्षातून अध्यापक विद्यालयाच्या ग्रंथालयातून आवश्यक ती संदर्भ पुस्तके मिळतात. अशी माहिती १९ प्राध्यापकांनी दिली आहे. त्याचे शेकडा प्रमाण ७९.१६ आहे. ग्रंथालयाचा दर्जा उत्कृष्ठ असणारे १० प्राध्यापक आहेत त्याचे शेकडा प्रमाण ४१.६६ आहे. चांगला दर्जा असणारे ७ प्राध्यापक आहेत त्याचे शेकडा प्रमाण २९.१६ आहे. साधारण दर्जा असणारे २ प्राध्यापक आहेत त्याचे शेकडा प्रमाण ८.३३ आहे.

यात सर्वात जास्त शेकडा प्रमाण ग्रंथालयाचा दर्जा उत्कृष्ठ असणाऱ्यांचे आहे. त्या प्रमाण ४१.६६ आहे.

२१] प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील सराव पाठा बाबतचे निष्कर्ष :-

एकूण प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीच्या माहिती निष्कर्षातुन सराव पाठा बाबत १८ प्राध्यापक समाधानी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ७५% आहे. तर सराव पाठा बाबत १ प्राध्यापक असमाधानी आहेत. त्याचे शेकडा प्रमाण ४.१६ आहे. परंतु असमाधानी कशामुळे आहेत त्याची कारणे प्राध्यापकांनी दिली नाहीत.

यात सर्वात जास्त प्रमाण समाधानी प्राध्यापकांचे आहे. सराव पाठा संदर्भात १४ प्राध्यापक सुचना करु इच्छित नाहीत त्याचे शेकडा प्रमाण ५८.३३ आहे. तर ५ प्राध्यापक सुचना करु इच्छितात त्याचे शेकडा प्रमाण २०.८२ आहे.

यात सुचना करु न इच्छिणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

२२] प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील सुक्ष्म अध्यापना बाबतचे निष्कर्ष :-

एकूण प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीच्या माहिती निष्कर्षातून सुक्ष्म अध्यापनाचे पाठ होत असताना वेगवेगळ्या अडचणी येणारे १३ प्राध्यापक आहेत. त्या प्रशिक्षणार्थी कडून सराव घेवून, त्यांच्यात सुधारणा घडवून आणल्या जातात. याचे शेकडा प्रमाण ५४.१६ आहे. तर अडचणी न येणारे ६ प्राध्यापक आहेत त्याचे शेकडा प्रमाण २५ आहे.

यात सुक्ष्म अध्यापनाचे पाठ होत असताना अडचणी येणाऱ्या प्राध्यापकांचे प्रमाण जास्त आहे.

७.५ ** सूचना / शिफारशी **

देशाचे भावी नागरिक ज्यांच्या हातून घडणार आहेत अशा शिक्षक प्रशिक्षणार्थींना योग्य आणि उच्च प्रतिचे प्रशिक्षण मिळावे ही ज्यातून शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाईल. तसेच त्याला अध्यापनाच्या कामाची गोडी निर्माण होईल यासाठी तसेच विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाच्या प्रशासनात सुधारणा घडून यावी यासाठी सूचना / शिफारशी खालील प्रमाणे आहेत :-

[०१] कोष्टक क्रमांक ६.१ च्या आधारे :-

एकूण प्रतिसादक प्रशिक्षणार्थ्यांना चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण मिळवून देवून प्रशिक्षणार्थ्यांना अध्यापनात गोडी निर्माण होईल की ज्यातून चांगले शिक्षक तयार होतील. अध्यापक विद्यालयात प्रशिक्षणार्थी स्त्री आणि पुरुष यांना स्वतंत्र विश्राम कक्ष असावेत.

[०२] प्रत्येक अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थींना प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र व्याख्यान कक्ष असावेत, त्यातील बैठक व्यवस्था योग्य असावी. फलक आणि प्रकाश योजना शैक्षणिकदृष्ट्या योग्य असावी.

[०३] प्रत्येक अध्यापक विद्यालयास स्वतंत्र ग्रंथालय, क्रीडांगण, विज्ञान प्रयोगशाळा, असावीत, शैक्षणिक साधने अध्यापक विद्यालयात मिळावीत, ग्रंथालयात सरावपाठासाठी लागणारी संदर्भ पुस्तके, पाठ्य पुस्तके मिळावीत. ग्रंथालयात अभ्यासिका असावी.

[०४] कार्यानुभवाचे शिक्षण मिळण्यासाठी वेगवेगळे विविध उपक्रम हाती घ्यावेत.

[०५] सरावपाठ घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येक अध्यापक विद्यालयास पाठ घेण्यासाठी काही शाळा सराव घेण्यासाठी नेमून दयाव्यात.

[०६] अध्यापक विद्यालये जरी विनाअनुदानित असली तरी अशा अध्यापक विद्यालयांना अनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थींना ज्या शैक्षणिक सुविधा मिळतात त्या प्रमाणे वेगवेगळ्या सुविधा मिळाव्यात.

[०७] अशा अध्यापक विद्यालयातील प्राचार्य पदावर असणारे प्राचार्य अनुभवी असावेत म्हणून त्यांना इतर अध्यापक विद्यालयां-प्रमाणे सोयी, सुविधा उपलब्ध करून दाव्यात म्हणजे अनुभवी प्राचार्य मिळतील.

[०८] अध्यापक विद्यालये जरी विनाअनुदानित तत्वावर चालत असली तरी अशा विद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना वेतन शासकीय नियमानुसार देण्यात यावे.

** ७.६ // पुढील संशोधनासाठी विषय //

अभ्यासकाने "उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानीत अध्यापक महाविद्यालयातील समस्यांचा चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास केला आहे. प्रकरण ७ मध्ये अभ्यासकाने प्रतिसादकांच्या माहितीच्या आधारे आपले निष्कर्ष मांडलेले आहेत. त्याच प्रमाणे सूचना किंवा शिफारशी ही केलेल्या आहेत. तरी ही या संबंधीचे सखोल ज्ञान, सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता अभ्यासकाला वाटते. त्यासाठी पुढील संशोधनासाठी विषय खालीलप्रमाणे आहेत -

[०१] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या समस्या.

[०२] मागासवर्गीय मुला-मुलींचे अध्यापक विद्यालयाबाबत औदासिनता.

[०3] अध्यापक विद्यालयात मागासवर्गीय मुला-मुलींना स्कॉलरशिप न मिळण्याची समस्या.

[०४] अध्यापक विद्यालयात मागासवर्गीय मुला-मुलींना मिळणारी अपमानास्पद वागणूक.

[०५] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात मिळणाऱ्या अपुऱ्या प्रशिक्षणाबाबतच्या समस्या.

[०६] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील शैक्षणिक साधनांच्या समस्या.

[०७] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात संपूर्ण अभ्यासक्रम राबविला जातो काय? - एक समस्या.

[०८] अध्यापक विद्यालयातील मिळणारे शिक्षण व्यावसायिक शिक्षणाशी सांगड घालू शकते काय?

[०९] आजच्या शिक्षण या पवित्र व्यावसायाला धंदेवाईक स्वरुप प्राप्त झाले आहे काय?

[१०] प्रशिक्षणाने सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व राष्ट्रीय प्रगती होते काय? - एक समस्या.

[११] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवू शकतील काय?

[१२] आजच्या मिळणा-या शिक्षणातून सामाजिक परीवर्तन घडू शकेल काय?

[१ ] स्वातंत्र्य पुर्व कालीन शिक्षण आणि स्वातंत्र्योत्तर कालीन शिक्षण एक तुलनात्मक अभ्यास.

[१४] विनाअनुदान शिक्षण पध्दतीमुळे झालेला शिक्षणावरील परीणाम.

[१५] आजच्या मिळणा-या प्रशिक्षणातून शिक्षक खऱ्या अर्थाने समाधानी आहे काय?

---------x---------